पुढारी | शनिवार ३ ऑक्टोबर २०१५

# दुर्मीळ छायाचित्रांतून म. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध : डॉ. मोरे

## 'गांधी इन साऊथ आफ्रिका' विद्यापीठात छायाचित्र प्रदर्शन

कोल्हापूर : प्रतिनिधी

'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' या दुर्मीळ छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या व्यक्तिमत्त्वाचा महात्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रक्रियेचा वेध घेता येऊ शकतो, असे मत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी.के. मोरे यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीतील आबालाल रेहमान आर्ट गॅलरीमध्ये गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गांधी इन साऊथ आफ्रिका' या छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी.व्ही. मुळे, डॉ. आर.बी. पाटील, उपग्रंथपाल डॉ. डी.बी. सुतार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित प्रदर्शनास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### पहिल्या सत्याग्रहापासून ते निरोपापर्यंतची ३० दुर्मीळ छायाचित्रे

प्रदर्शनात महात्मा गांधी यांची दक्षिण आफ्रिकेमधील वास्तव्या दरम्यानची सुमारे तीस दुर्मीळ छायाचित्रे त्यांच्या माहितीसह प्रदर्शित करण्यात आली आहेत. यात आफ्रिकेतील महात्मा गांधींचे वकिली करतानाचे ऑफिस, नाताळ काँग्रेस सदस्यांसमवेत, पहिल्या सत्याग्रह, दक्षिण आफ्रिकेतून निरोप आदी फोटोंचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या बॅ. खर्डेकर ग्रंथालयातील महात्मा गांधी यांच्यासंदर्भातील सुमारे शंभर निवडक ग्रंथही ठेवण्यात आले आहेत. ९ ऑक्टोबरपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार आहे.